Shri Sangameshwar Education Society's

# Sangameshwar Public School

Saat Rasta, Solapur - 413 001.

UDISE No. : 27301203225 Phone : 0217 - 2313388








## पुणे येथे तीन दिवसीय ड्रीम महोत्सव

प्रतिनिधी । सोलापूर

ड्रीम महोत्सवाचे २८ ते ३० जानेवारी या कालावधीत पुणे येथील राजा रवीवर्मा आर्ट गॅलरी, येथे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवातसोलापुरातील म्युझिक, आर्ट , डान्स अकॅडमी तर्फे पुणे येथे हे ड्रीम्स आर्ट एक्झीबिशन सादर करणार आहे. याचे उदघाटन प्रख्यात चित्रकार घनशाम देशमुख, प्रतिभा धोत्रे यांच्या हस्ते होणार आहे.

सकाळी अकरा ते रात्री नऊ या वेळेत हे प्रदर्शन सुरू राहील. या कला प्रदर्शनात चित्रकला स्पर्धा, गायन, लाईव्ह प्रात्यक्षिक, फॅशन शो यांचा समावेश असणार आहे. या प्रदर्शनात अबोली देशमुख, निशा जैन, प्रतिभा पोरेडी, पूजा जाजू, सीमरन गांधी, महेक केढिया, सलोनी पांडव, वैभवी पांडव, सीमा सालोटगी, मृगल पटेल यांनी तयार केलेल्या चित्रांचे प्रदर्शन असेल अशी माहिती आयोजक

*एमएडी अकॅडमी ने आयोजित केलेल्या या मेगा इव्हेंटमध्ये सोलापुरातील कलाकाराला संधी असेल. प्रत्येक कलाकार आपले ड्रीम्स जपत असतो. ते साकारण्याची जिद्दही असते. त्याचा हुंकार उमटविणे हेच या ड्रीम्स कला प्रदर्शनाचे मुख्य उद्दिष्ठ आहे.*

**- विकास गोसावी,** आर्टिस्ट, प्रदर्शन समन्वयक

विकास गोसावी, आसावरी गांधी, डॉ. प्रीयल दोशी यांनी दिली या ड्रीम्स आर्ट एक्झिबिशनमध्ये निशा जैन, मोनिका गुजर, कशफ मुंढेवाडी, सिद्धांत जैन, मानव गायकवाड, प्रतीक जगदाळे, सोनल पांचाळ, राहूल बिराजदार, बसवराज जमखंडी, देवाशिष कहाते, एकता कांबळे हे आर्टिस्ट विविध कलाप्रकारांचे सादरीकरणही या प्रदर्शनाद्वारे करणार आहेत. सोलापूर - पुणे मधील या कलाकारांना हे अनोखे व्यासपीठ ठरेल. त्यांच्या कलागुणांचा ठसा उमटेल, तसेच कलेला उत्तेजनही मिळेल.

**Ms. Seema Salotagi**, our art teacher had the honour of having her **art exhibition** held at Pune.